# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २९४ - २३** **दिनांक : - ०२/०९/२०२३**

## चोरी करणाऱ्या सराईत आरोपीतास जि. जोनपुर राज्य उत्तरप्रदेश येथुन अटक पेल्हार पोलीस ठाणे – गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगीरी.

पेल्हार पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दि. २६/०७/२०२३ रोजी दुपारी ०२.०० वा. ते ०२.२० वा. च्या दरम्यान फिर्यादी श्री. कलीमुल्ला तुफैलअहमंद खान, वय ३३ वर्ष, यांच्या, कलीममुल्ला टिंबर ॲन्ड प्लायवुड दुकान संतोषभुवन नाका, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथिल दुकानाचे दरवाज्यावाटे आत प्रवेश करुन दुकानातील बंद ड्राव्हरचे लॉक उचकटुन त्यामधील १,५०,०००/ रु. रोख रक्कम फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीता विरुध्द पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि.नं. I ६९८/२०२३, भा.दं.वि.सं.कलम ३८०, ३४ प्रमाणे दिनांक २८/०७/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयाचे तपासाच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणच्या व गुप्त बातमीदारांच्या मार्फतीने मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी नामे - मोहम्मद कलाम सलामुद्दीन अन्सारी, वय ३९ वर्षे, सध्या रा. भोईवाडा भिवंडी ता. भिवंडी, जि. ठाणे मुळ रा. गौराबादशापुर, ता. सदर जि. जोनपुर राज्य उत्तरप्रदेश यांस **जि. जोनपुर राज्य उत्तर प्रदेश** येथुन सदर गुन्हयाचे कामी अटक करुन त्यांच्याकडुन सदर गुन्हातील चोरीचे ५०,०००/- रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. आरोपीत यांच्या विरोधात रायगड, मुरबाड, भिवंडी, ठाणे या ठिकाणी गुन्हे नोंद आहेत. सदर आरोपीत याचेकडे तपास केला असता पेल्हार पोलीस ठाणेच्या अभिलेखावरील एकुण २ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**- उघडकीस आलेले गुन्हे -**

१) पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि. नं. I ६९८/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३८०,३४ प्रमाणे.

२) पेल्हार पोलीस ठाणे गु.रजि. नं. I ५८७/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सा़ो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सा़ो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सा़ो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/सोपान पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं./रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**----0000----**